महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ७७ वे | दिनांक : १०/०३/२०२६ | वार : मंगळवार

## सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ३०६ कोटींचा निधी : छगन भुजबळ



**नाशिक** : त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी केंद्र सरकारने तब्बल ३०६ कोटींचा निधी मंजूर केल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे अन्न व पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आज सोमवारी दिली. यावेळी त्यांनी नाशिकमधील रिंगरोड, मुख्य रस्त्यांची दुरुस्ती, भव्य वाहनतळ, भाविकांसाठी तात्पुरती निवारागृहे (साधुग्राम) आणि मिसिंग लिंक रोड यासारख्या प्रकल्पांना केंद्र सरकारकडून १०० टक्के अर्थसहाय्य मिळणार असल्याचेही सांगिले.

छगन भुजबळ यांनी सांगितले की, नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२६-२७ हा धार्मिक सोहळा नाशिकच्या सर्वांगीण विकासाची मोठी संधी आहे, हा दूरदृष्टिकोन ठेवून आपण केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. केंद्र सरकारच्या 'भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष अर्थसहाय्य योजन'अंतर्गत 'नाशिक कुंभमेळा २०२६-२७' साठी मी सादर केलेल्या प्रकल्पांपैकी ३०६ कोटींच्या प्रकल्पांना केंद्र सरकारने निधी मंजूर केला आहे. ही नाशिक जिल्ह्यासाठी अतिशय आनंदाची बाब आहे. याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. तसेच या निधीसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करतो.

भुजबळ म्हणाले, केंद्र सरकारने राज्यांसाठी 'भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना २०२४-२५' सुरू केल्यानंतर नाशिक जिल्ह्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी तब्बल १५,१७२ कोटी रुपयांचा भव्य विकास आराखडा आपण प्रशासनाकडून तयार करून घेतला होता. सन २०२४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामार्फत हा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविण्यात आला होता. सन २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामार्फत या प्रकल्पांना मंजुरी मिळविण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्याला यश आले आहे.

मी सादर केलेल्या नाशिकमधील रिंगरोड, मुख्य रस्त्यांची दुरुस्ती, भव्य वाहनतळ, भाविकांसाठी तात्पुरती निवारागृहे (साधुग्राम) आणि मिसिंग लिंक रोड यांसारखे महत्त्वाचे प्रकल्प मंजूर झाले असून, सदर प्रकल्पांसाठी केंद्र शासनाचे १००% अर्थसहाय्य मिळणार आहे. त्यामुळे राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार येणार नाही. या निधीतून आपले नाशिक जागतिक स्तरावरील आयकॉनिक टुरिस्ट सेंटर बनेल, असा मला ठाम विश्वास आहे. या निधीमुळे कुंभमेळ्याचे नियोजन अधिक सुलभ होणार असून, नाशिकच्या पायाभूत सुविधांना शाश्वत दर्जा प्राप्त होणार आहे.

यापूर्वी आपण केलेल्या पाठपुराव्यामुळे गोदाघाट परिसरातील 'राम काल पथ' उभारणीसाठी ९९.१४ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. आता प्राप्त झालेल्या ३०६ कोटींच्या निधीमुळे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला खऱ्या अर्थाने वेग मिळणार असून, दळणवळण आणि परिवहन सुविधा अधिक गतिमान होणार आहेत. नाशिकच्या जनतेच्या व असंख्य भाविकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांचे हे फलित आहे, असे मी मानतो. नाशिकला जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा मिळवून देण्यासाठी आणि विकासाचा हा रथ असाच वेगाने पुढे नेण्यासाठी मी यापुढेही प्रयत्नशील राहीन, असे भुजबळ म्हणाले.

## राज्यात नवीन ऑटो रिक्षा परवान्यांवर ब्रेक

**मुंबई** : राज्यात वाढत चाललेली वाहतूक कोंडी आणि शहरी प्रदूषण या गंभीर समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यात आज म्हणजेच ९ मार्चपासून नवीन ऑटो रिक्षांना परवाने देण्याची प्रक्रिया तात्पुरती थांबवण्यात आली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. मंत्रिमंडळाशी चर्चा करून आणि स्पष्ट कार्यपद्धती म्हणजेच एसओपी तयार केल्यानंतरच पुढे नवीन परवाने देण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे सध्या राज्यभरात नवीन ऑटो रिक्षा परवाने मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.


परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, राज्यातील अनेक मोठ्या शहरांमध्ये ऑटो रिक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामुळे वाहतुकीवर मोठा ताण निर्माण होत असून ट्रॅफिक जामची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. विशेषतः मुंबई आणि उपनगरांमध्ये रिक्षांची संख्या प्रचंड वाढल्याने वाहतूक व्यवस्थापन अधिक कठीण झाले आहे. शहरांमधील रस्त्यांची क्षमता आणि वाहनांची वाढती संख्या यामध्ये मोठा तफावत निर्माण झाल्यामुळे काही काळासाठी नवीन परवाने देण्याची प्रक्रिया थांबवणे आवश्यक असल्याचे सरकारचे मत आहे.

या निर्णयाबाबत केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानंतररस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने राज्य सरकारला स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे. मोटार वाहन (सुधारणा) कायदा २०१९) अंतर्गत राज्य सरकारला वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक अधिकार देण्यात आले आहेत. तसेच मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ६७ (३) नुसार राज्य सरकारला प्रवासी आणि मालवाहतुकीसंबंधी परवाने बदलण्याचा तसेच विविध योजना राबवण्याचा अधिकार आहे. या अधिकारांचा वापर करून वाहतूक कोंडी कमी करणे, लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारणे आणि शहरांमधील वाहतूक व्यवस्था नियंत्रित करणे शक्य असल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे.

सरनाईक यांनी पुढे सांगितले की, सध्या राज्यभरात सुमारे १४ लाख ऑटो रिक्षा परवाने वितरित करण्यात आले आहेत. काही ठिकाणी एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांना रिक्षा परवाने देण्यात आल्याच्या तक्रारी सरकारकडे आल्या आहेत. तसेच काही प्रकरणांमध्ये बांगलादेशी नागरिकांनाही अवैध पद्धतीने परवाने मिळाल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करून परवाना प्रणाली अधिक पारदर्शक आणि नियंत्रित करण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सरकारकडे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे शहरांमधील स्थानिक परिस्थिती, वाहतुकीच्या गरजा आणि नागरिकांची सोय लक्षात घेऊन नवीन धोरण तयार करण्यात येणार आहे. लवकरच स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे म्हणजेच एसओपी निश्चित करण्यात येईल. मंत्रिमंडळात चर्चा झाल्यानंतर आणि नवीन धोरण अंतिम झाल्यानंतरच राज्यात पुन्हा ऑटो रिक्षा परवाने देण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

## जगप्रसिद्ध वेरूळ लेणीतील किरणोत्सव : पर्यटकांना ९ व ११ मार्चला अनुभवता येणार सोहळा, १० मार्चला लेणी राहणार बंद



**वेरूळ** : जगप्रसिद्ध वेरूळ लेणीतील लेणी क्रमांक १० (विश्वकर्मा लेणी) येथे दरवर्षी १० मार्च रोजी होणारा 'किरणोत्सव' हा प्राचीन भारतीय वैज्ञानिक वास्तुकलेचा एक अद्भुत नमुना मानला जातो. मात्र, यंदा १० मार्च रोजी मंगळवार असून लेणीची साप्ताहिक सुट्टी असल्याने, मुख्य दिवशी पर्यटकांना हा सोहळा अनुभवता येणार नाही. असे असले तरी, सूर्यकिरणांचा हा खेळ ९ आणि ११ मार्च रोजीही अंशतः पाहायला मिळणार असल्याने पर्यटकांची पावले वेरूळकडे वळत आहेत.

दरवर्षी १० मार्च रोजी सायंकाळी ४:३० ते ५:१० या वेळेत सूर्यकिरणे लेणीच्या गवाक्षातून (खिडकीतून) आत प्रवेश करतात. ही किरणे थेट चैत्यगृहातील भगवान गौतम बुद्धांच्या आसनस्थ मूर्तीच्या मुखावर पडतात. यामुळे संपूर्ण लेणी प्रकाशमय होते. प्राचीन शिल्पकारांनी सूर्याच्या वार्षिक प्रवासाचा, गणिताचा आणि खगोलशास्त्राचा सखोल अभ्यास करून या लेणीची रचना केली होती, याची साक्ष हा किरणोत्सव देतो.

यंदा १० मार्चला मंगळवार आल्याने भारतीय पुरातत्व विभागातर्फे (ASI) लेणी पर्यटनासाठी बंद राहणार आहे. त्यामुळे मुख्य दिवशी हा सोहळा पाहण्यावर मर्यादा येणार आहेत. मात्र, खगोलशास्त्रीय रचनेनुसार ९ मार्च आणि ११ मार्च रोजी देखील सूर्यकिरणे मूर्तीवर थोडी तिरपी पडतात. या दिवसांतही हा नयनरम्य अनुभव घेता येत असल्याने अभ्यासक आणि पर्यटकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्थानिक प्रशासनाने केले आहे.

वेरूळची लेणी क्रमांक १० ही तिच्या चैत्यगृहासाठी आणि छताच्या रचनेसाठी प्रसिद्ध आहे. लेण्यांच्या काळोखात सूर्यकिरणांनी मूर्तीला अभिषेक घालणे, हा केवळ प्रकाशाचा खेळ नसून आपल्या पूर्वजांच्या प्रगत स्थापत्य कौशल्याचा पुरावा आहे. दरवर्षी हा सोहळा पाहण्यासाठी देश-विदेशातून पर्यटक मोठ्या संख्येने गर्दी करतात.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० मार्च २०२६

## मुंबई ठाणे प्रमाणे शहर वासियांना सुद्धा कायमस्वरूपी मालमत्ता कर माफी द्या - डॉ राजेंद्र दाते पाटील





**मुंबई (प्रतिनिधी) :** मुंबई ठाणे मनपाच्या धर्तीवर औरंगाबाद मनपा क्षेत्रात ८०० ते १००० चौरस फुटांपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या घरांना कायमस्वरूपी मालमत्ता करमाफी द्यावी अशी मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव आणि शहर विकासाचे जेष्ठअभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी राज्य शासना कडे केली असता या विषयाची एवढ्या व्यस्ततेत मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने दखल योग्य त्या निर्देशां सह हा प्रस्ताव अतिरिक्त मुख्य सचिव डॉ गोविंदराज यांचे कडे पाठवला असल्याचा मेल डॉ राजेंद्र दाते पाटील यांना प्राप्त झाला असल्यामुळे नेहमी प्रमाणे मुख्यमंत्र्यांनी त्यांचे निवेदनाची दखल घेऊन वेगळेच संकेत दिल्याचे स्पष्ट होत आहे. पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक आणि डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी पूर्वी केलेल्या मागणीची तत्कालीन मुख्यमंत्री यांनी तात्काळ दाखल घेत सदरची मागणी पुढील कारवाई साठी नगररचना विभाग महाराष्ट्र शासन यांना पाठवला होता.नेमक्या डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी सूचित केल्या प्रमाणे जनहितार्थ हा ठराव चर्चेत आला आणि त्याच धर्तीवर मुंबई मनपा मध्ये याच धर्तीवरनुकतेच ठाणे महापालीके च्या वतीने ५०० चौरस फुटांपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या घरांना मालमत्ता करमाफी देण्याचा ठराव सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला होता. सत्ताधारी सह ठाण्यातील सर्वपक्षीय नगरसेवकांनी सर्वानुमते या ठरावाला मंजुरी दिली.हीच मागणी आणि अपेक्षा त्यांनी औरंगाबाद मनपा प्रशासन आणि पदाधिकारी व सर्व पक्षीय नगरसेवका कडे केली आहे. मनपा प्रशासना कडून मुंबईत हा प्रस्ताव राज्य शासना कडे पाठवून त्यास मंजुरी घेऊन त्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.करमाफी मुळे महापालिके च्या उत्पन्नावर परिणाम होण्याची शक्यता असली तरी आता छत्रपती संभाजीनगर शहराची निवड" स्मार्ट सिटी प्रकल्पात "झालेली असल्यामुळे उत्पन्नात मोठया प्रमाणावर वाढ होणार आहे.याच धर्तीवर छत्रपती संभाजीनगर महानगर पालीका क्षेत्रात सुद्धा वरील नमुद प्रमाणे जनहितार्थ कायम स्वरूपी निर्णय घेणेसाठी प्रशासक/ आयुक्त मनपा छत्रपती संभाजी नगर यांना निर्देशीत करावे आणि तसा सकारात्मक ठराव शासनाकडे पाठवण्याचे निर्देश व्हावेत ही विनंती करण्यात आली आहे. शहर वासीयांना दिलासा देण्या साठी विषयांकित ठराव आयुक्त - प्रशासक,मनपा छत्रपती संभाजीनगर यांनी करावा म्हणुन तसे निर्देश होणे गरजेचे आहे.राज्य सरकारने वरील विषयांकित निर्णय करणे साठी तात्काळ निर्णय घेतला जाण्याची प्रचंड मोठी गरज आहे.म्हणुन मुंबई-ठाणे मनपाच्या धर्तीवर औरंगाबाद मनपा क्षेत्रात ८०० ते १००० चौरस फुटांपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या घरांना व मालमत्तांना करमाफी कायम स्वरूपी देण्याचे निर्देश नगर विकास विभागास होणे आणि त्या अनुषंगाने आयुक्त प्रशासक मनपा छत्रपती संभाजी नगर यांनी उपरोक्त प्रमाणे मंजुरी घेणे बाबतचा ठराव राज्य शासना कडे पाठविण्याचे तात्काळ जनहितार्थ आदेश व्हावेत ही जनहितार्थ विनंती राज्य शासनास या पूर्वीच करण्यात आलेली असुन आता लोक नियुक्त सदस्य नगरसेवक म्हणुन निवडून आलेले असल्या मुळे सर्व पक्षीय नगरसेवकांनी एक मुखी ठराव करून वरील प्रमाणे ठराव शासनास पाठवावा अशी विनंती व मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव आणि शहर विकासाचे जेष्ठअभ्यासक जनआंदोलन विकास कृती समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी केली असुन या अनुषंगाचे पत्र देखील त्यांनी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे.

## महाराष्ट्र ही वीरांगनांची भूमी..



**कन्नड :** 'जागतिक महिला दिना'च्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह (IPS अधिकारी) यांच्या प्रमुख उपस्थितीत सितानाईक तांडा ता. कन्नड येथे यशस्वी महिला व गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या प्रसंगी त्या बोलत होत्या. ८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शुक्रवार दि. ६ मार्च २०२६ त्रिमुखसिंह सामाजिक संस्था आणि मा. सरपंच केशव राठोड यांच्या सहकार्याने ग्रामपंचायत सितानाईक तांडा येथे, यशस्वी महिलांचा आणि उच्चशिक्षित गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार व विशेष सन्मान सोहळ्याचा कार्यक्रम संपन्न झाला... यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह (IPS अधिकारी) यांची प्रमुख उपस्थिती आणि मार्गदर्शन लाभले. त्यांनी तांड्यातील मुलींना व महिलांना मार्गदर्शन करताना महाराष्ट्र ही विरांगणाची भूमी आहे. आपल्या देशातल्या महिला 'अबला' नसून त्या 'सबला' आहेत. त्यामुळे याच भूमीवर शूर, पराक्रमी, धाडसी महिलांनी इतिहास घडवला आहे. राजमाता अहिल्यादेवी होळकर, ज्यांनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले त्या राजमाता जिजाऊ, भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले, भारताची पहिली महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, लक्ष्मीबाई टिळक, मेरी कोम, अंतराळवीर कल्पना चावला, सुनीता विल्यम्स अशा कित्येक विरांगनाची नावे सांगता येतील. स्त्रीमध्ये सृष्टी निर्माण करण्याची शक्ती निसर्गाने दिली आहे. ही सृष्टी घडवण्यामध्ये सर्वात मोलाचा वाटा हा महिलांचा आहे. आज कायद्याने स्त्रियांना समानता मिळालेली आहे. परंतु पूर्वी पुरुष प्रधान संस्कृती असल्यामुळे महिलांना दुय्यम स्थान दिल्या गेले त्यांना 'अबला' समजल्या गेले. गाव खेड्यामध्ये आणि काही प्रमाणात शहरांमध्ये सुद्धा अजूनही 'चूल आणि मूल एवढेच तिचे काम' असे समजून ती पुरुषावर अवलंबून आहे. परंतु तिला जर आई-वडिल, सासू सासऱ्यांचा, नवऱ्याचा पारिवारिक आधार मिळाला तर ती आजही स्वावलंबी आणि सक्षम बनू शकते.. आज-काल गाव खेड्यांमध्ये निरक्षरतेमुळे आणि योग्य ते समुपदेशन न मिळाल्यामुळे मुला-मुलींचे पळून जाण्याचे अनेक प्रकार सध्या घडत आहेत. ह्या घटना सांस्कृतिक दृष्ट्या फार गंभीर आहेत. त्यामुळे आपण पालकांनी संवेदनशीलतेने आपल्या पाल्यांना संस्कार देणे ही काळाची गरज बनली आहे. ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन (IWD), दरवर्षी साजरा केला जातो म्हणजे लैंगिक समानतेचा विचार करताना महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय कामगिरीची ओळख करून देणारा हा जागतिक दिवस आहे. ज्यांनी माझा पाठलाग करून मला इथे बोलावले. ते त्रिमुखसिंह सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राहुल राठोड आणि त्यांचे सर्व सहकारी तरुणांनीच हा कार्यक्रम आयोजित केला आहे. मुलींना/महिलांना या कार्यक्रमातून प्रेरणा मिळावी या हेतूने त्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन मुद्दामहून ग्रामीण भागात केले आहे. आजची तरुण पिढी चांगल्या कामासाठी पुढे येत आहे ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. त्यामुळे अशा कार्यक्रमांमुळे खऱ्या अर्थाने स्त्रियांना समानतेची वागणूक मिळेल आणि त्यांचेही कार्य उज्वल होईल यात काही शंका नाही. आपण सर्वांनी महापुरुषांच्या जीवनकार्याची प्रेरणा घेतल्यास चांगले दिवस फार दूर नाही. जाता जाता IPS अधिकारी अन्नपूर्णा सिंह म्हणाल्या इतक्या लांबून आले पण आपल्याला भेटून आनंद वाटला. माझ्या स्वागतासाठी पारंपरिक नृत्याचे आयोजन पाहून दुरून आल्याचे सार्थक झाले. असे गौरवोद्गार अन्नपूर्णा सिंह यांनी काढले.

यावेळी मा. सरपंच केशव राठोड, संस्थेचे अध्यक्ष राहुल राठोड, सचिव केदार कुलकर्णी, कार्यक्रमाचे निमंत्रक, सूत्रसंचालक प्रा. केशरचंद राठोड व सुप्रसिद्ध गायक पि. के. राठोड, नाशिकवरून अॅड. चंद्रकांत वाघ, श्रीमती स्मिता वाघ, पुण्यावरून सहा. प्राध्यापक शितल सोनवणे, छत्रपती संभाजीनगर वरून अॅड. सौरभ औटे, एकनाथ मानवतकर, सचिन इधारे, सागर निकम आणि विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या यशस्वी महिला आदी पाहुण्यांसोबत सितानाईक तांड्यातील सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट

स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० मार्च २०२६


## छ. शिवाजी महाराज, संभाजी महाराज व सर्व महामानव हेच समाजाचे खरे हिरो - विशाल देशमुख



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर जिंतूर) :** दिनांक ८ मार्च रोजी शहरातील माऊली मंगल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा व छत्रपती लेझीम चषक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख वक्ते विशाल देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज तसेच समाजातील सर्व महामानव हेच खरे हिरो असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी शिवचरित्रातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल मेटांगळे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जयानंद मत्रे, विजय गीते, सुदर्शन कानडे, गोविंद कदम, राकेश भोई, सुदान सानप, मनीष सावळे, गजानन डोंबे, वाहूळे मॅडम, मते मॅडम, नवले मॅडम, काळे मॅडम तसेच छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काजळे व सचिव बालाजी शिंदे सोसकर उपस्थित होते.यावेळी बोलताना विशाल देशमुख म्हणाले की, महात्मा फुले यांनी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली. वर्तमानपत्रातून माहिती मिळाल्यानंतर त्यांनी दोन ते तीन दिवस शोध घेत छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली. आणि पहिली छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती रायगडावर साजरी केली असल्याचे त्यांनी नमूद केले.विद्यार्थ्यांनी शिवचरित्रातून प्रेरणा घेत अंधश्रद्धेपासून दूर राहावे, असे आवाहन करताना त्यांनी सांगितले की, जिजाऊंच्या संस्कारांमुळेच छत्रपती शिवाजी महाराज घडले. मात्र आजच्या काळात अनेक माता मोबाईलवरील रील्स व दूरचित्रवाणी मालिकांमध्ये व्यस्त राहतात. त्यामुळे पालकांनी मुलांवर चांगले संस्कार करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छत्रभुज ससे यांनी केले, तर आभार संग्राम पिंपळकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोपान धापसे, संजय काळे, अनिल दाभाडे, शरद ठोंबरे, संतोष शिंदे, सचिन स्वामी, विलास रोकडे आदींसह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व पालक उपस्थित होते.

## विद्यापीठाच्या इतिहास विभागात इतिहास महोत्सव व प्रा. आर. एस गुप्ते व्याख्यानमालेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा हा इतिहास व संस्कृतीचा समृद्ध वारसा लाभलेला भूभाग आहे. प्राचीन, मध्ययुगीन ते आधुनिक दखखनच्या जडण-घडणीत त्याचा महत्वाचा वाटा राहिला आहे. महाराष्ट्राच्या साहित्य, संस्कृती व परंपरेचा तो आधारबिंदू राहिला आहे. मराठवाडयाच्या या संपन्न वारशाचे जतन, संवर्धन, संशोधन व प्रसार करण्याचे कार्य इतिहास व प्राचीन भारतीच संस्कृती विभाग त्याच्या स्थापनेपासून करत आलेला आहे. शास्त्रशुद्ध चौकटीत इतिहास अध्ययन, अध्यापन व संशोधन करणे, इतिहास विचारातील विवेक जनसामान्यांपर्यंत रूजवणे यांसाठी इतिहास विभाग अनेक प्रकारचे उपक्रम राबवत आलेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून दि. १०-११ मार्च २०२६ रोजी इतिहास महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या इतिहास महोत्सवामध्ये प्रा. आर एस गुप्ते व्याख्यानमालेचे चार पुष्प गुंफण्यात येणार आहेत तसेच मराठवाड्यातील भक्ती परंपरा चित्र प्रदर्शन प्रदर्शित होणार आहे.या चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन10 मार्च 2026 वेळ : स. 11.00 उदघाटक: प्रा.डॉ. प्रविण वक्ते (संचालक संतपीठ, पैठण) पुष्प पहिले10 मार्च 2026 वेळ : स. 11.30विषय : मॅनेजमेंट जगद्गुरु आणि वैश्विक तुकोबारायवक्ते : ह.भ.प. प्रशांत महाराज मोरे देहूकर (संत तुकाराम महाराजांचे विद्यमान 11 वे वंशज, आंतरराष्ट्रीय किर्तनकार व्याख्याते व लेखक)पुष्प दुसरेवेळ : दु. 12.30विषय : मराठवाड्यातील वारकरी संतांचे सामाजिक योगदानवक्ते : ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बंडगरीला कदाचे स्याते, किर्तनकार)पुष्प तिसरे11 मार्च 2026 वेळ : स. 11.30विषय : भक्ती संप्रदायातील दुर्लक्षित घटकवक्तेः डॉ. सतिश कदम (निवृत्त प्रा. यशवंतराव चव्हाण वरिष्ठ महाविद्यालय, तुळजापूर)पुष्प चौथेवेळ : स. 12.30विषय : सुफी संप्रदाय तत्व व विचारवक्तेः प्रा.डॉ. गनी पटेल(निवृत्त प्रा., चिश्तिचा कला व विज्ञात वरिष्ठ महाविद्यालय, खुलताबाद)अध्यक्ष : प्रा. डॉ. दुलारी कुरेशी(निवृत्त प्रा, तथा माजी संचालक पर्यटनशास्त्र प्रशासन विभाग)अशा चार विषयावर विशेष व्याख्याने होणार आहेत. ही व्याख्याने इतिहास वस्तुसंग्रहालय,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. इतिहास महोत्सव व डॉ. आर एस गुप्ते व्याख्यानमालेला उपस्थित राहण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. गीतांजली बोराडे, डॉ.पुष्पा गायकवाड व डॉ. बिना सेंगर व विभागातील सर्व प्राध्यापकांच्या वतीने करण्यात येत आहे.

## ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयात महिला सफाई कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार...



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या सभागृहात रविवारी (ता. ८) रोजी मुरूम नगर परिषदेमध्ये कार्यरत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. शहर स्वच्छतेसाठी अहोरात्र परिश्रम करणाऱ्या दुर्लक्षित व वंचित महिलांना साडी-चोळी देऊन त्यांचा विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शिल्पा डागा होत्या. यावेळी डॉ. सुवर्णा पाटील, उमरगा सेंटरच्या शिल्पा क्षीरसागर, मुरूम सेंटर च्या अनिता मिरकले आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कष्टाने आणि जिद्दीने मुलांना घडविणाऱ्या कर्तबगार मातांपैकी आई सुमन शिंदे व वडील लक्ष्मण शिंदे पाटील यांचा मुलगा बलराज शिंदे पाटील यांनी सी. ए. उत्तीर्ण, गिरीजा कांबळे, सुनिता क्षीरसागर, चिताबाई कांबळे, सुक्षाबाई भालेराव, शिवगंगा कांबळे, ज्योती हावळे, नंदाबाई कांबळे, मनीषा वाघमारे, नंदिनी कांबळे, कल्याणताई कांबळे, शांता कांबळे, वैशाली सोनकांबळे, अनिता कांबळे, लिंबाबाई कांबळे आदी सफाई कर्मचाऱ्यांचा साडी-चोळी देऊन विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सुनिल राठोड, कल्लाप्पा स्वामी, डॉ. नितीन डागा, डॉ. महेश मोटे, प्रा. भूषण पाताळे, वैष्णवी सूर्यवंशी, श्रुती नागदे आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संतोष कांबळे तर आभार सचिव कल्लाप्पा पाटील यांनी मानले. या समाजपयोगी उपक्रमाबद्दल सफाई महिला कर्मचाऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. रोटरीच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## वयाच्या सातव्या वर्षी श्रद्धेचा पहिला टप्पा पूर्ण केले



**दौलताबाद (जावेद अहमद) :** बायजीपुरा गल्ली न ०१ छत्रपती संभाजीनगर येथिल मरीयम अनवर खान पठाण वय सात वर्ष हिने आपल्या जीवनातील पहिला रोजा उपवास पूर्ण केले आहे छोट्या रोजदार तिचे आजोबा, आजी, आई वडील, मामा, आत्या, नातेवाईक यांनी तिचे कौतुक केले आहे


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103

E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी., थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० मार्च २०२६


# महिला दिन आणि एकल महिलांचा अदृश्य संघर्ष

आंतरराष्ट्रीय महिला दिन हा महिलांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या हक्कांच्या जाणीवेचा दिवस मानला जातो. मात्र या दिवसाच्या उत्सवी वातावरणामागे समाजातील काही महिलांचे वास्तव अत्यंत कठीण आणि वेदनादायक आहे. विधवा, परित्यक्ता आणि एकल महिलांचे जीवन आजही अनेक संघर्षांनी वेढलेले आहे. आर्थिक असुरक्षितता, सामाजिक उपेक्षा, मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी आणि मानसिक ताण यामुळे या महिलांचे आयुष्य एक अखंड लढाई ठरते.देशातील वास्तव आणि आकडेवारीभारतामध्ये एकल महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. विविध सामाजिक अहवाल आणि जनगणना आकडेवारीनुसार देशात कोट्यवधी महिला विधवा किंवा एकल अवस्थेत जीवन जगत आहेत.काही महत्त्वाची आकडेवारी :भारतात सुमारे 4 ते 5 कोटी विधवा महिला आहेत.देशातील सुमारे 10–12% महिला या एकल किंवा परित्यक्ता स्वरूपात राहतात.ग्रामीण भागात आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या अनेक एकल महिलांकडे स्थिर उत्पन्नाचे साधन नाही.शिक्षणाच्या बाबतीत पाहिले तर आर्थिक परिस्थितीमुळे अनेक मुलांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते.ही आकडेवारी केवळ संख्या नाही तर समाजातील एका मोठ्या वास्तवाचे प्रतिबिंब आहे.एकल महिलांचे सामाजिक आणि मानसिक आयुष्यपतीचे निधन, घटस्फोट किंवा कौटुंबिक मतभेद यामुळे एकट्याने संसार सांभाळणाऱ्या महिलांना समाजात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.प्रमुख समस्या :समाजातील सहानुभूतीपेक्षा संशयाची नजरआर्थिक उत्पन्नाचे मर्यादित स्रोतमानसिक तणाव व एकटेपणाकुटुंब आणि समाजाकडून कमी पाठबळग्रामीण भागात आजही काही ठिकाणी विधवा महिलांकडे सामाजिक समारंभांमध्ये वेगळ्या नजरेने पाहिले जाते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो.मुलांच्या शिक्षणातील अडथळेएकल महिलांच्या मुलांना देखील अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.शालेय फी आणि शैक्षणिक खर्चअभ्यासासाठी योग्य वातावरणाचा अभावमानसिक आधाराची कमतरताकाही वेळा बालमजुरीचा धोकाअनेक प्रतिभावान विद्यार्थी आर्थिक कारणांमुळे शिक्षणापासून वंचित राहतात.शासकीय योजनांची मदतमहिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र आणि राज्य सरकार विविध योजना राबवत आहेत.महत्त्वाच्या योजना :संजय गांधी निराधार अनुदान योजना – निराधार महिलांना आर्थिक मदतइंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजना – विधवा महिलांसाठी मासिक पेन्शनमहिला आर्थिक विकास महामंडळ (MAVIM) – स्वयंरोजगार आणि प्रशिक्षणस्वयं सहाय्यता गट योजना – महिलांना बचत व व्यवसायासाठी प्रोत्साहनप्रधानमंत्री मातृ वंदना योजनामुलांच्या शिक्षणासाठी योजना व स्कॉलरशिपRTE अंतर्गत २५% आरक्षणराष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना (NSP)राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्तीखाजगी संस्थांच्या शिष्यवृत्ती योजनायाशिवाय अनेक स्वयंसेवी संस्था, ट्रस्ट आणि सामाजिक संघटना शिक्षणासाठी आर्थिक मदत देतात.फक्त योजना पुरेशा नाहीतसरकारच्या योजना महत्त्वाच्या असल्या तरी अनेक महिलांपर्यंत या योजनांची माहिती पोहोचत नाही. अर्ज प्रक्रिया, कागदपत्रे आणि प्रशासकीय अडथळे यामुळे काही महिला या सुविधांपासून वंचित राहतात.त्यामुळे पुढील गोष्टी आवश्यक आहेत :योजनांची सोप्या पद्धतीने माहिती व अंमलबजावणीकौशल्य विकास व रोजगार प्रशिक्षणमुलांच्या शिक्षणासाठी विशेष शैक्षणिक निधीसामाजिक मानसिक आधार आणि समुपदेशनमहिला दिनाचा खरा अर्थमहिला दिन हा केवळ अभिनंदनाचा किंवा औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसून समाजातील दुर्लक्षित महिलांच्या प्रश्नांकडे गंभीरपणे पाहण्याची संधी आहे. विधवा, परित्यक्ता आणि एकल महिलांना आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक बळ दिल्याशिवाय खरे महिला सक्षमीकरण शक्य नाही.समाज, शासन आणि स्वयंसेवी संस्था यांनी एकत्र येऊन या महिलांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण केला तरच महिला दिनाचा खरा अर्थ साकार होईल.


**- भगवंत पाळवदे**

बीड

मो. 99757 04391


## इंडियन वर्ल्ड फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये "माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर" चित्रपटास विशेष पुरस्कार




**छत्रपती संभाजीनगर :** येथील अवलोकितेश्वर प्रॉडक्शन्स निर्मित "माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर" या चित्रपटाला हैदराबाद येथे संपन्न झालेल्या 10 व्या इंडियन वर्ल्ड फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये ऑनरेबल ज्यूरी मेंशन हा विशेष पुरस्कार मिळाला आहे. देश-विदेशातील अनेक चित्रपटांनी या महोत्सवात सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये "माईसाहेब" या चित्रपटाला विशेष गौरव मिळाला. प्रकाश त्रिभुवन दिग्दर्शित व निर्मित हा चरित्रपट डॉ. सविता भीमराव आंबेडकर (माईसाहेब) यांच्या जीवनकार्यावर आधारित असून त्यांच्या सामाजिक योगदानाचा सखोल वेध घेतो. या चित्रपटाचे सहाय्यक दिग्दर्शक आदित्य कुमार आहेत.हैदराबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात चित्रपटाचे स्क्रीनिंग देखील करण्यात आले होते. या प्रदर्शनाला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. चित्रपटानंतर दिग्दर्शकांनी आपल्या चित्रपटामागील भूमिका मांडली तसेच प्रेक्षकांनी विविध प्रश्न विचारून चित्रपटाबद्दल अधिक माहिती जाणून घेतली.या चित्रपटाला यापूर्वीही अनेक मानाचे सन्मान प्राप्त झाले आहेत. कान्स वर्ल्ड फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपट हा पुरस्कार, अंबरनाथ इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये उत्कृष्ट वेशभूषा पुरस्कार (छाया त्रिभुवन) तसेच इतर महोत्सवांमध्येही चित्रपटाचा गौरव करण्यात आला आहे.

## सोंगणी

झाली सोंगणी सोंगणी
पीकं खळ्यात चालली
शिवाराच्या काळजात
हुरहुर रे दाटली

आता लागला उन्हाळा
ओल खोल खोल गेली
काळ्या भुईच्या मनाची
कशी पानगळ झाली

वारं भयान सुटलं
झळा उन्हाच्या तापल्या
चिटपाखरांच्या संगे
फांद्या उन्हात रापल्या

रानं उदासली सारी
भेगा भुईला पडल्या
रणरणत्या रानात
किती सावल्या भाजल्या

येता सण आखाजीचा
शेतकरी रानीवनी
उगड्या नागड्या मातीत
सुरू झाली वखरणी

रान मशागत होता
सारं शिवार हसलं
रानोमाळी शिवारात
रानवारं हुंदडलं

गंध सुटता मातीचा
रान हरखून गेलं
पुन्हा सपन हिरवं
मायमातीला पडलं




**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० मार्च २०२६

## शेत बापाला सांगते

रोज राबतो शेतात
अनवाणी माझा बाप
देत नाही रे कोणाला
आयुष्यात कधी ताप.

राब राबून शेतात
आले हातावर फोड
राबणाऱ्या रे बापाला
मिळणार नाही गोड.

काम करता करता
बाप माझा झोपी गेला
त्याच्या नशिबात
आज
सुख दुःखा सवे
आला.

पीक डोलता शेतात
बाप आनंदीत झाला
अवकाळी पावसाने
दुःख घेऊनच आला.

अचानक पावसाने
असा कहरच केला
पीक पाहून शेतात
बाप खचूनच गेला.

क्षणोक्षणी होते दुःख
कसे सांगावे तुम्हाला
कळणार नाही कधी
दुःख बापाचे जगाला.

इथे नाही कोणी वाली
शेत बापाला सांगते
सदोदित आई माझी
दुःख झाडाला टांगते



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले : स्त्रीशिक्षणाच्या प्रकाशवाटेच्या शिल्पकार

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांनी आपल्या धैर्य, दूरदृष्टी आणि निःस्वार्थ कार्यातून समाजाच्या विचारविश्वाला नवे परिमाण दिले. स्त्रीशिक्षणाचा पाया रचणाऱ्या, सामाजिक समतेचा विचार रुजवणाऱ्या आणि मानवतेच्या मूल्यांना जीवनकार्याचे स्वरूप देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव त्या थोर व्यक्तिमत्त्वांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नसलेल्या, जातिभेद आणि अंधश्रद्धांच्या जोखडात अडकलेल्या भारतीय समाजात त्यांनी प्रबोधनाची ज्योत पेटवली. स्त्रीला शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. १० मार्च हा दिवस त्यांच्या स्मृतिदिनाच्या रूपाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका महान समाजसुधारकाची आठवण करून देणारा दिवस नसून स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे एका साध्या शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील खंडोजी नेवसे आणि आई लक्ष्मीबाई नेवसे हे कष्टाळू आणि साधे स्वभावाचे होते. त्या काळात भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. स्त्रीचे आयुष्य घरकाम, कुटुंबाची सेवा आणि सामाजिक बंधनांच्या चौकटीत मर्यादित ठेवले जात असे. बालविवाह, विधवांवरील अन्याय, स्त्रीशिक्षणाचा अभाव आणि जातीय विषमता या समस्या समाजात खोलवर रुजलेल्या होत्या. अशा वातावरणात सावित्रीबाईंचे बालपण गेले. लहान वयातच त्यांचा विवाह महात्मा ज्योतिराव फुले यांच्याशी झाला. हा विवाह सावित्रीबाईंच्या आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण वळण ठरला. महात्मा ज्योतिराव फुले हे अत्यंत प्रगत विचारांचे समाजसुधारक होते. त्यांनी समाजातील अन्यायकारक परंपरांना आव्हान देण्याचा धाडसी मार्ग स्वीकारला होता. विवाहानंतर त्यांनी सावित्रीबाईंना शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्या काळातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली तर हा निर्णय अत्यंत क्रांतिकारक होता. समाजातील अनेक लोकांनी या निर्णयाचा विरोध केला. परंतु ज्योतिराव फुले यांनी सामाजिक टीकेची पर्वा न करता सावित्रीबाईंना शिक्षण दिले. सावित्रीबाईंनीही अत्यंत मेहनतीने शिक्षण घेतले आणि पुढे त्या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका बनल्या. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव होती.१८४८ साली पुण्यातील भिडेवाडा येथे सावित्रीबाई फुले आणि ज्योतिराव फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. ही घटना भारतीय शिक्षणाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानली जाते. त्या काळात मुलींना शाळेत पाठवणे हे समाजाच्या दृष्टीने अत्यंत अनुचित मानले जात होते. सावित्रीबाई शाळेत जात असताना अनेक लोक त्यांच्यावर दगड, चिखल आणि गोमूत्र फेकत असत. त्यांना अपमानास्पद शब्दांनी हिणवले जात असे. परंतु या सर्व अपमानांना न जुमानता सावित्रीबाई दररोज शाळेत जात राहिल्या. त्या आपल्या पिशवीत दोन साड्या घेऊन जात असत. एखादी साडी खराब झाली तर दुसरी साडी नेसून त्या पुन्हा वर्गात जाऊन मुलींना शिकवण्याचे काम सुरू करत असत. त्यांच्या या धैर्यामुळे आणि चिकाटीमुळे स्त्रीशिक्षणाची ज्योत अखंड प्रज्वलित राहिली. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा प्रसार करताना समाजातील दलित, शोषित आणि वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. त्या काळात जातिव्यवस्था अत्यंत कठोर होती आणि खालच्या जातींतील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. शिक्षण ही केवळ उच्चवर्णीयांची मक्तेदारी मानली जात होती. परंतु सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांनी या अन्यायकारक व्यवस्थेला आव्हान दिले. त्यांनी दलित मुलांसाठी आणि मुलींसाठी अनेक शाळा सुरू केल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे समाजातील दुर्लक्षित घटकांना शिक्षणाची संधी मिळाली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात समता निर्माण करता येईल, असा त्यांचा ठाम विश्वास होता.सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठीही मोठा संघर्ष केला. त्या काळात विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. समाजाने त्यांच्यावर अनेक बंधने लादली होती. विधवांना शिक्षण घेण्याची किंवा पुनर्विवाह करण्याची संधी नव्हती. अनेक वेळा अविवाहित किंवा विधवा स्त्रियांना समाजाच्या भीतीने नवजात बालकांची हत्या करण्यास भाग पाडले जात असे. या अमानुष प्रथेला आळा घालण्यासाठी सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांनी पुण्यात "बालहत्या प्रतिबंधक गृह" सुरू केले. येथे अवांछित किंवा अनाथ बालकांना सुरक्षित आश्रय दिला जात असे. या कार्यामुळे अनेक बालकांचे प्राण वाचले आणि अनेक स्त्रियांना सन्मानाने जगण्याची संधी मिळाली. सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षिका नव्हत्या तर त्या एक संवेदनशील कवयित्रीही होत्या. त्यांच्या "काव्यफुले" आणि "बावनकशी सुबोध रत्नाकर" या काव्यसंग्रहांमधून समाजजागृतीचा प्रभावी संदेश दिला आहे. त्यांच्या कवितांमध्ये शिक्षणाचे महत्त्व, आत्मसन्मान, सामाजिक समता आणि मानवतेचा विचार स्पष्टपणे दिसून येतो. अज्ञानाच्या अंधारातून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे, हा संदेश त्यांनी आपल्या साहित्यामधून समाजापर्यंत पोहोचवला.सावित्रीबाई फुले यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला. सत्यशोधक समाजाचा उद्देश समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि अन्यायकारक प्रथा दूर करून समतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करणे हा होता. सावित्रीबाई फुले यांनी या चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आणि स्वाभिमान जागृत करण्याचे कार्य केले. त्यांनी स्त्रियांना स्वतःच्या अधिकारांची जाणीव करून दिली आणि समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली.सावित्रीबाई फुले यांच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे त्यांची मानवसेवा. १८९७ साली पुण्यात प्लेगची भीषण साथ पसरली होती. त्या काळात अनेक लोक आजारी लोकांपासून दूर राहू लागले होते. परंतु सावित्रीबाई फुले यांनी समाजसेवेचा आदर्श घालून दिला. त्यांनी प्लेगग्रस्त लोकांची सेवा करण्यासाठी पुढाकार घेतला. त्या आजारी लोकांना स्वतः खांद्यावर उचलून दवाखान्यात घेऊन जात असत. या सेवाकार्यात त्यांना प्लेगचा संसर्ग झाला आणि १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. समाजसेवेच्या कार्यात स्वतःचे प्राण अर्पण करणाऱ्या या महान स्त्रीचे जीवन खऱ्या अर्थाने मानवतेच्या सेवेसाठी समर्पित होते.सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा प्रभाव आजच्या भारतीय समाजावरही स्पष्टपणे दिसून येतो. आज स्त्रीशिक्षणाला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जाते. मुली शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमध्ये प्रगती करत आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, राजकारण, साहित्य, कला आणि क्रीडा अशा अनेक क्षेत्रांमध्ये महिलांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या सर्व परिवर्तनामागे सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या समाजसुधारकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी पेटवलेली शिक्षणाची ज्योत आज लाखो मुलींच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करत आहे.आजच्या आधुनिक समाजातही स्त्री-पुरुष असमानता, शिक्षणातील विषमता आणि सामाजिक भेदभाव पूर्णपणे नाहीसे झालेले नाहीत. ग्रामीण भागात अजूनही अनेक मुलींना शिक्षणाच्या संधी मर्यादित प्रमाणात मिळतात. महिलांवरील अत्याचार, लैंगिक भेदभाव आणि सामाजिक रूढींचा प्रभाव अजूनही काही प्रमाणात दिसून येतो. त्यामुळे सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची आणि कार्याची आवश्यकता आजही तितकीच महत्त्वाची आहे. त्यांच्या विचारांमधून समाजाला समतेचा, शिक्षणाचा आणि मानवतेचा मार्ग दिसतो.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या भारतीय स्त्रीशक्तीचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी समाजातील जाचक परंपरांना आव्हान देऊन स्त्रीला शिक्षण, स्वाभिमान आणि समानतेचा मार्ग दाखवला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा निर्माण झाली. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे ज्ञान, समता आणि मानवतेचा मार्ग होय.१० मार्च हा दिवस सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने आपण त्यांच्या महान कार्याचे स्मरण करतो. परंतु त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे होय. समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, स्त्री-पुरुष समानतेची जाणीव वाढवणे आणि मानवी मूल्यांवर आधारित समाजरचना निर्माण करणे ही आजच्या काळातील महत्त्वाची गरज आहे.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन म्हणजे संघर्ष, धैर्य, समर्पण आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणादायी गाथा आहे. त्यांनी आयुष्यभर शिक्षण, समता आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजाला नवी दिशा मिळाली. म्हणूनच सावित्रीबाई फुले यांचे नाव भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात सदैव आदराने घेतले जाईल. त्यांच्या स्मृतिदिनी आपण त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून अधिक न्याय्य, समताधिष्ठित आणि शिक्षित समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहणे हीच त्यांना अर्पण केलेली खरी श्रद्धांजली ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० मार्च २०२६


## प्रा. डॉ. शांताराम रायपुरे अध्यक्ष तर सुधाकर रत्नपारखे सचिवपदी सर्वानुमते निवड



**जालना (प्रतिनिधी) :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचे महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जालना शहरात दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या नूतन कार्यकारिणीची निवड दि. 08 मार्च रोजी पार पडलेल्या बैठकीत सर्वानुमते करण्यात आली. या बैठकीत आगामी वर्षभर विविध सामाजिक-शैक्षणिक उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले.बैठकीत प्रा. डॉ. शांताराम रायपुरे यांची व्याख्यानमालेच्या अध्यक्षपदी तर सुधाकरभाई रत्नपारखे यांची सचिवपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. ही निवड उपस्थित मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि व्याख्यानमालेच्या कार्यकर्त्यांच्या एकमताने करण्यात आली.जालना शहरात गेल्या अनेक दशकांपासून सातत्याने आयोजित होणारी ही व्याख्यानमाला यंदा 49 व्या वर्षात प्रवेश करत आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय मानली जाते. यंदाची व्याख्यानमाला 8 एप्रिल ते 13 एप्रिल या कालावधीत अंबड रोडवरील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या मैदानावर आयोजित करण्यात येणार आहे. या सहा दिवसांच्या कालावधीत समाजप्रबोधन, संविधान, सामाजिक न्याय, शिक्षण, दलित चळवळ आणि समकालीन सामाजिक-राजकीय प्रश्नांवर विविध मान्यवरांचे व्याख्यान होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. जालना शहरात आंबेडकरी विचारांच्या प्रसारासाठी ही व्याख्यानमाला गेली अनेक वर्षे महत्त्वाचे व्यासपीठ ठरली आहे. राज्यातील नामवंत विचारवंत, प्राध्यापक, लेखक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील अभ्यासक या व्याख्यानमालेत सहभागी होत असतात.नूतन कार्यकारिणीच्या गठनासाठी आयोजित बैठकीत सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मागील वर्षातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. प्रा. डॉ. विजय कुमठेकर यांनी मागील वर्षाचा आर्थिक अहवाल सादर केला. अहवाल सादर करताना मागील कार्यकारिणीने केलेल्या कार्यक्रमांचे कौतुक करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी मागील वर्षी घेतलेल्या व्याख्यानमालेतील कार्यक्रमांची गुणवत्ता आणि समाजप्रबोधनात्मक भूमिका अधोरेखित केली. यावेळी उपस्थितांनी आगामी वर्षातही अधिक प्रभावी, अभ्यासपूर्ण आणि जनजागृती करणारे कार्यक्रम आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली.या बैठकीत विविध मान्यवरांनी व्याख्यानमालेच्या परंपरेचा गौरव करत पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करणाऱ्या मान्यवरांमध्ये मा. ॲड. बी. एम. साळवे, ॲड. ब्रह्मानंदजी चव्हाण, सुदामरावजी सदाशिवे, ॲड. शिवाजीराव आदमाने यांचा समावेश होता. बैठकीच्या अध्यक्षस्थानी सुधाकरसेठ रत्नपारखे होते. मान्यवरांनी आपल्या भाषणात सांगितले की, डॉ. आंबेडकरांचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी व्याख्यानमाला हा प्रभावी मार्ग आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक समता यांचा प्रसार करण्यासाठी अशा उपक्रमांची आज अधिक गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला ही केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम नसून समाजप्रबोधन, संविधानिक मूल्यांचा प्रचार आणि आंबेडकरी विचारांची जपणूक करणारे प्रभावी व्यासपीठ म्हणून ओळखली जाते. गेल्या अनेक वर्षांपासून या व्याख्यानमालेने समाजातील विविध प्रश्नांवर चिंतन घडवून आणत जनजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. यंदाच्या 49 व्या वर्षातही ही व्याख्यानमाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समता, बंधुता आणि न्यायाच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.या बैठकीस जालना परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांमध्ये राम गायकवाड, अंकुशराव चव्हाण, साईनाथ चिन्नदोरे, नागसेन वाचनालयाचे राजेश राऊत, संजय भालेराव, प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, प्रा. डॉ. कालिदास सूर्यवंशी, प्रा. डॉ. सुधीर पडघन, प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे, अशोक लबडे, अशोक रगडे, विलास रत्नपारखे, राजेंद्र जाधव, सिद्धार्थ मोरे, अशोक साबळे, जगन्नाथ हनवते, पंजाबराव खिल्लारे, जी. आर. चिकटे, बबनराव रत्नपारखे, सतीश वाहुळे, प्रकाश मगर, राजकुमार दांडगे, भास्कर घेवंदे, सुभाष कांबळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा समावेश होता. या बैठकीचे सूत्रसंचालन संजय हेरकर यांनी केले, तर प्रा. डॉ. विजय कुमठेकर यांनी आभार प्रदर्शन केले.

## यूजीसी सुधारणांवरील चर्चा आणि सामाजिक न्यायाचे सदोष राजकारण

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) नियमावलीत प्रस्तावित बदलांवरील अलीकडील वादांमुळे जातीचे वर्चस्व, सामाजिक भेदभाव आणि उच्च शैक्षणिक संस्थांमधील 'सामाजिक न्याय' या संकल्पनेवर व्यापक राजकीय चर्चा सुरू झाली आहे. उच्चवर्णीय अभिजनांच्या एका गटाने UGC च्या या नियमांना विरोध केला आहे, तर दुसरीकडे उच्च न्यायपालिकेने या धोरणात्मक सुधारणेला तातडीने स्थगिती दिली. प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियाने देखील हे नियम उच्चवर्णीय अभिजनांच्या विरोधात भेदभाव करणारे आहेत असे म्हणत ते रद्द करण्यासाठी दबाव वाढवला.जरी या नियमांची सुरुवात केंद्र सरकारने केली असलीतरी भारतीय जनता पक्षाने देखील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांचा बचाव करण्याबाबत संकोच दाखवला आहे.आपल्या हक्काच्या मतदारांना, म्हणजेच उच्चभ्रू समाजाला (Social Elites) नाराज करणे हे भाजपला परवडणारे नाही.तथापि, अशा प्रकारे अंतर राखल्यामुळे बहुजन समूह दुरावण्याचा धोका आहे; कारण सत्तेतील आपले प्रतिनिधित्व वाढेल आणि ठोस सामाजिक व वर्गीय गतिशीलता प्राप्त होईल, या आशेने हे समूह हिंदुत्वाच्या विचारधारेत सामील झाले आहेत.सध्याच्या वादात, बहुजन गट आपल्या हितसंबंधांना चालना देण्यासाठी विखुरलेले आणि नेतृत्वहीन दिसत असले, तरी त्यांच्यामध्ये उजव्या विचारसरणीच्या पक्षाच्या निवडणूक यशाला बाधा पोहोचवण्याची क्षमता आहे.समावेशक 'सबाल्टर्न हिंदुत्व'राष्ट्रीय राजकारणात नरेंद्र मोदींच्या प्रभावी उदयामुळे भारतीय जनता पक्षाच्या सामाजिक चरित्रात मोठे बदल झाले आहेत.भाजपने आपला पारंपारिक 'ब्राह्मणवादी' केंद्रबिंदू बदलून दलित, बहुजन आणि आदिवासी (DBA) समूहांना पक्षाच्या संरचनेत सामावून घेण्यास सुरुवात केली आहे.एका नवीन ''सबाल्टर्न' हिंदुत्व' पक्ष म्हणून भाजपचे निवडणूक यश हे मोठ्या प्रमाणावर या समूहांच्या (DBA) पाठिंब्यावर अवलंबून आहे, तर सामाजिक अभिजन हा त्यांचा आधीपासूनचा हुकमी जनाधार राहिला आहे. पक्षाच्या या नवीन 'सोशल इंजिनीअरिंग'मुळे दलित-बहुजन जातींचे 'अधिकृत' प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षांना जसे की, उत्तर प्रदेशातील बहुजन समाज पक्ष, समाजवादी पक्ष आणि बिहारमधील राष्ट्रीय जनता दल यांना चेकमेट केले आहे. असुरक्षित जातींमधील (vulnerable castes) एका मोठ्या गटाने (विशेषतः अतिवंचित) आपल्या कल्याणासाठी भाजपवर अधिक विश्वास टाकला आहे; त्यांना अशी आशा आहे की, एक सर्वसमावेशक हिंदुत्व प्लॅटफॉर्म त्यांना सामाजिक सन्मान आणि सत्तेच्या संरचनेत न्याय्य वाटा मिळवून देईल.काही ठराविक दलित-बहुजन-आदिवासी समूहांच्या या पाठिंब्यामुळे भाजप हा शक्तीशाली (formidable force) बनला आहे. तथापि, त्यांच्या या पाठिंब्याच्या बदल्यात, या समूहांना सत्तेच्या संरचनेत केवळ 'प्रतीकात्मक' (Tokenistic) स्थान मिळाले आहे. त्यांची वर्गीय स्थिती आजही नाजूक (Precarious) असून, त्यांना अनेकदा वर्चस्ववादी सामाजिक गटांकडून भेदभाव आणि हिंसाचाराला सामोरे जावे लागते. कनिष्ठ OBC गटांचा (प्रामुख्याने कारागीर जाती, भूमिहीन मजूर आणि शहरी लोकसंख्येतील निम्न मध्यमवर्गीय विभाग) आधुनिक राज्य संस्था आणि शहरी बाजार अर्थव्यवस्थेत नगण्य वाटा आहे. शिवाय, दर्जेदार उच्च शिक्षणापर्यंत पोहोच मर्यादित असल्याने, आयटी-संबंधित आणि इतर प्रतिष्ठित व्यवसायांमध्ये त्यांची उपस्थिती अत्यंत अल्प राहिली आहेओबीसींचा प्रश्न2023 मध्ये बिहार जाती सर्वेक्षणाचे आकडे जाहीर झाल्यानंतर, समोर आलेल्या माहितीनुसार राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास 40% लोकसंख्या ही 'अति-मागासवर्गीय' (EBC) आहे.यातील बहुतांश लोक भूमिहीन आहेत किंवा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहेत; तसेच त्यांची शैक्षणिक स्थिती ही दलित आणि आदिवासींच्या स्थितीशी मिळतीजुळती आहे.अशी अपेक्षा होती की राज्य आणि केंद्र या दोन्ही स्तरांवरील सत्ताधारी संस्था या गंभीर परिस्थितीची दखल घेतील आणि त्यांच्या कल्याणासाठी काही ठोस धोरणे आखतील.मात्र, तसा कोणताही पुढाकार घेण्यात आला नाही.शैक्षणिक संस्थांमध्ये ओबीसी उमेदवारांना भेडसावणाऱ्या वाढत्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी UGC ची ही नवीन नियमावली तयार करण्यात आल्याचे दिसून येते. केंद्रीय विद्यापीठे आणि आयआयएम (IIMs), आयआयटी (IITs) आणि एम्स (AIIMS) सारख्या नामांकित संस्थांमध्ये अनुसूचित जाती/जमाती आणि ओबीसी कोटा भरण्यात अपयशी ठरल्याबद्दल शिक्षण मंत्रालयाला विरोधकांकडून सातत्याने टीकेचा सामना करावा लागत आहे. केंद्रीय विद्यापीठांमधील प्राध्यापकांच्या भरतीबाबतच्या संसदीय अहवालात असे दिसून आले आहे की, केंद्रीय विद्यापीठांच्या प्राध्यापकवर्गात ओबीसींचे प्रमाण 3% पेक्षाही कमी आहे. महत्त्वाचे म्हणजे, भरती प्रक्रियेत त्यांना उघड भेदभावाचा सामना करावा लागतो. विशेषतः 'योग्य उमेदवार आढळला नाही' (Not Found Suitable) या शेऱ्याचा वापर करून. अनुसूचित जाती/जमातींच्या तुलनेत, ओबीसी सदस्यांकडे कॅम्पसमध्ये होणाऱ्या जाती-आधारित भेदभावापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी मर्यादित संस्थात्मक पाठबळ उपलब्ध आहे.UGC च्या नवीन नियमावलीत, अनुसूचित जाती आणि जमातींसोबत ओबीसी आणि इतर असुरक्षित गटांचा (जसे की EWS) समावेश करणे, ही या वास्तवाची कबुली आहे की, विद्यापीठ परिसरातील एक मोठा वर्ग आजही उच्चभ्रू समाजाच्या वर्चस्वाखाली 'असुरक्षित' गट म्हणून जगत आहे आणि म्हणूनच त्यांना कायदेशीर संरक्षणाची गरज आहे. शैक्षणिक संस्थांना अधिक लोकशाहीवादी, सर्वसमावेशक आणि सामाजिक न्यायाच्या अजेंड्याप्रती उत्तरदायी बनवण्यासाठी हे नवीन नियम एक अत्यंत महत्त्वाचे 'सुधारणात्मक पाऊल' असल्याचे दिसून आले. मात्र, झालेल्या तीव्र विरोधामुळे या सुधारणा रखडल्या असून, त्यामुळे दलित-बहुजन-आदिवासी समूहांना भेडसावणारी असुरक्षितता अद्यापही सुटलेली नाही.भाजपसमोरील राजकीय पेचभाजपच्या 'सर्वसमावेशक हिंदुत्वा'ने दलित-बहुजन-आदिवासी समूहांच्या एका मोठ्या वर्गाला आकर्षित केले आहे आणि पक्षाला हिंदू एकतेचा एक आश्वासक प्रतिनिधी म्हणून सादर केले आहे. मात्र, UGC च्या वादाने या बहुचर्चित संकल्पनेसमोर मोठे आव्हान उभे केले असून, सामाजिक अवकाशात जातीय विभागणी अजूनही किती खोलवर रुजलेली आहे, हे उघड केले आहे. UGC च्या नवीन सुधारणांविरुद्ध झालेल्या विरोधाने हे स्पष्ट केले आहे की, उपेक्षित सामाजिक गटांच्या सर्वांगीण कल्याणाविषयी सामाजिक अभिजनांना फारशी चिंता नाही. जेव्हा जेव्हा सामाजिक न्यायाची धोरणे पारंपारिक सत्ताधारी अभिजनांच्या नियंत्रण आणि वर्चस्वाला धक्का लावतात, तेव्हा अशा प्रयत्नांना 'देशविरोधी', 'गुणवत्तेला बाधक' किंवा 'अस्मितेच्या राजकारणाचे लाड' ठरवून लक्ष्य केले जाते.भाजप आपल्या धोरणात्मक चौकटीच्या राजकीय अनिवार्यतेबद्दल उच्चवर्णीय अभिजनांचे मन वळवण्यात अपयशी ठरला आहे. खरे तर अशी धोरणे, जी दलित-बहुजन-आदिवासी समूहांची अत्यंत दयनीय स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक आहेत. उच्चभ्रू समाजाच्या एका गटाने केलेला हा गदारोळ यशस्वी ठरला, कारण भाजपने यावर बाळगलेले मौन आणि सामाजिक न्यायाच्या धोरणांचा बचाव करण्यात दाखवलेला संकोच कारणीभूत आहे. उजव्या विचारसरणीचा पक्ष आणि पुराणमतवादी सामाजिक अभिजन यांच्यातील या लागेबांध्यामूळे (Nexus) सामाजिक न्यायाचा अजेंडा परिघावर फेकला गेला असावा; परंतु यामुळे असुरक्षित सामाजिक गटांमध्ये एक नवीन जाणीव देखील निर्माण होत आहे. हिंदुत्वाच्या राजकारणात आपला केवळ वापर होत आहे याची त्यांना जाणीव होत असून ज्याचा परिणाम या समूहांच्या उजव्या विचारसरणीच्या पक्षातून बाहेर पडण्यात होऊ शकतो.




**लेखक : हरीश एस. वानखेडे,**
सेंटर फॉर पॉलिटिकल स्टडीज, जेएनयू,
नवी दिल्ली
**भाषांतर : प्रा. प्रियदर्शन भवरे,**
समाजशास्त्र विभाग, बद्रीनारायण बारवाले
महाविद्यालय,
जालना. सौजन्य : द हिंदू , दि. ३ मार्च २०२६



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002